लोकमत
हॅलो पुणे
पुणे, सोमवार, दि. २८ मार्च २०१८

राज्यात मराठी भाषा अनुवादकांचा तुटवडा

शासन बेफिकीर : दहा वर्षांपासून २०हून अधिक पदे रिक्त

धान्य देण्यास टाळाटाळ : अन्नसुरक्षा योजनेतील अनेक लाभार्थी वंचित, गरिबांचा घास हिरावून घेण्याचा प्रकार

रेशन दुकानदारांचा धान्यावर डोळा

३९.८

बांधकामाला पिण्याचे पाणी

पालिकेचे दुर्लक्ष : एकीकडे वणवा, दुसरीकडे ज्वलनशील

भाजपा सरकारविरोधी

राज्यात मराठी भाषा अनुवादकांचा तुटवडा

लोकमत

विशेष

शासन बेफिकीर : दहा वर्षांपासून २०हून अधिक पदे रिक्त

⊞Enlarge Image

येत्या काळात अनुवादकांची संख्या वाढावी यासाठी राज्य मराठी विकास संस्थेतर्फे प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करण्यात येणार आहे. अनुवादकांची विशेष यंत्रणा उभी राहावी यासाठी संस्था येत्या काळात विशेष प्रयत्न करेल. यासाठी अनुवादाचे रीतसर प्रशिक्षण संस्थेतर्फे दिले जाईल.

- डॉ. आनंद काटीकर, प्रभारी संचालक, राज्य मराठी विकास संस्था सायली जोशी-पटवर्धन ■ पुणे

एकीकडे मराठी भाषेचा विकास आणि मराठीचा आग्रह धरला जात असताना शासनस्तरावर मात्र मायबोलीबाबत उदासीनता असल्याचे दिसून येत आहे. अनेक वर्षांपासून शासनाच्या भाषा संचालनालयाला मराठी भाषा अनुवादकांचा तुटवडा असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या विकासाच्यादृष्टीने शासन काही ठोस पाऊले उचलणार का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सध्या मोदी सरकार डिजिटल इंडियाचा नारा देत आहे. त्यानुसार राज्यातील सर्व शासकीय कामे स्थानिक भाषेत होण्यासाठी मराठी भाषेच्या अनुवादकांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. राज्यातही केंद्रात असलेल्या सत्तेचेच नेतृत्त्व असताना राज्याकडून पंतप्रधानांच्या या मोहिमेचा गांभीर्याने विचार केला जातो का, हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात मागील १० वर्षांपासून भाषा संचालनालयातील २०हून अधिक पदे रिक्त